## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/ मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**महोदय/महोदया,**

मा. विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी संदर्भ क्र. विससं/उशि/कोवि/२०१९/१६१० दि.२९/०४/२०१९ रोजीच्या पत्रान्वये अशासकीय महाविद्यलायातील विद्याशाखांना कायम विनानुदान तत्वावर मंजुरी देणेबाबतचे धोरण शासनाने अवलंबण्यापुर्वी ज्या विद्याशाखांना विनाअनुदान तत्वावर शासनाने मंजुरी दिलेली आहे. मात्र विद्यार्थी संख्येचा निकष पुर्ण करित नसल्याने अद्याप अनुदान मंजुर करणेत आलेले नाही अशा विनाअनुदानित विद्याशाखांची माहिती तात्काळ सॉफ्ट आणि हार्ड कॉपी स्वरूपात संबंधित जिल्ह्यांसाठी नमुद E-mail वर सादर करण्याबाबत कळविण्यात आले असून सदरचे पत्र माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

**टिप- सदर माहितीची प्रत सॉफ्ट आणि हार्ड कॉपी स्वरूपात या विभागास खास दुतामार्फत व affiliation.t२@unishivaji.ac.in या ईमेलवर तात्काळ सादर करावी.**

कळावे,

सोबत- वरीलप्रमाणे

आदेशान्वये

उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

संदर्भ क्र. संलग्नता टी-२/ 803
दिनांक- 4 MAY 2019

E:\Sm\Circular\Circular.docx

महाराष्ट्र शासन

# विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण),कोल्हापूर विभाग,कोल्हापूर

राजाराम कॉलेज परिसर,विद्यानगर,कोल्हापूर.४१६००४

Web:www.jdhekop.org, jdhekop@gmail.com

फोन नं.(०२३१)२५३५४००/२५३५४५४ फॅक्स नं.(०२३१)२५३५४००

जा.क.विससं/उशि/कोवि/२०१९/ 1610 / /२०१९ 29 APR 2019

प्रति,

सर्व प्राचार्य,

सर्व कला,वाणिज्य,विज्ञान,विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये

कोल्हापूर विभाग,कोल्हापूर

विषय :- अशासकीय महाविद्यालयांतील विनाअनुदानित विद्याशाखांची माहिती देणेबाबत

संदर्भ :-१.संचालनालयाकडील पत्र क्र.एनजीसी/२०१५/११५५९३/विज्ञानशाख अनु./औवि/मवि-२ दि.१-३-२०१९

संचालनालयाकडील संदर्भीय पत्रास अनुसरुन कळविणेत येते की, अशासकीय महाविद्यालयातील विद्याशाखाना कायम विनाअनुदान तत्वावर मंजूरी देणेबाबतचे धोरण शासनाने अवलंबण्यापूर्वी ज्या विद्याशाखांना विनाअनुदान तत्वावर शासनाने मंजूरी दिलेली आहे. मात्र विद्यार्थी संख्येचा निकष पूर्ण करीत नसल्याने अद्याप अनुदान मंजूर करणेत आलेले नाही अशा विनाअनुदानित विद्याशाखांची माहिती खालील विवरणपत्रात भरुन तात्काळ सॉप्ट आणि हार्ड कॉपी स्वरुपात तसेच संबंधित जिल्हयासाठीच्या खालीलप्रमाणे **E-mail** वर सादर करावी.**(सदर माहिती DVB-TTSurekh या फॉण्टमध्ये देणे आवश्यक आहे)**

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नांव | मुळ मान्यतेचा दिनांक आदेशासह | शासन मान्यता मिळालेली संबंधित विद्याशाखा | संबंधित विद्याशाखेतील विद्यार्थी संख्या वर्षनिहाय | येणारा वार्षिक खर्च रुपये | महाविद्यालयास मान्यतेच्या दिनांकापासून विद्यापीठाचे संलग्नीकरण आहे काय ? |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

१. कोल्हापूर जिल्हा- kolhapur.anudan1@gmail.com

२. सातारा जिल्हा- jdhekop.anudan2@gmail.com

३. सांगली जिल्हा- jdhekop.anudan3@gmail.com

विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण
कोल्हापूर विभाग,कोल्हापूर

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत पुणे- ४११ ००१
Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in
फोन नं ०२०/२६१२२११६/२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं ०२०/२६१११११५३


क्र.एनजीसी/ २०१५/११५९३/विज्ञानशाखा अनु.औवि/मवि-२ /[illegible] दि. ०१-०३-२०१९

प्रति,

सर्व

विभागीय सहसंचालक ,उच्च शिक्षण

**विषय :** अशासकीय विना अनुदानित महाविद्यालयांना अनुदान मंजूरीबाबत.

संदर्भ : शासन पत्र क्र. अनुदा-२०१८/(२९/१८)/ मशि-४ दि. १८ फेब्रुवारी २०१९

उपरोक्त विषयाबाबत संदर्भीय शासन पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, अशासकीय महाविद्यालयांतील विद्याशाखांना कायम विना अनुदान तत्वावर मंजूरी देण्याबाबतचे धोरण शासनाने अवलंबिण्यापूर्वी, ज्या विद्याशाखांना विना अनुदान तत्वावर शासनाने मंजुरी दिलेली आहे. मात्र अनुदानासाठी अंमलबजावणीत असणाऱ्या शासन निर्णयातील विद्यार्थी संख्येचे निकष पुर्ण करत नसल्याने त्याना अद्यापही अनुदान मंजुर करण्यात आलेले नाहीत. अशी आपल्या विभागामध्ये एकुण किती महाविद्यालये सुरु आहेत. अशा महाविद्यालयातील संबंधित विद्याशाखा अनुदानावर आणावयाची झाल्यास एकुण किती वार्षीक खर्च अपेक्षित आहे, याबाबतचा सविसतर तपशील खालील विवरणपत्रामध्ये सादर करण्यात यावा.

| अक्र | महाविद्यालयाचे नाव | मुळ मान्यतेचा दिनांक आदेशासह | शासन मान्यता मिळालेली संबंधित विद्याशाखा | संबंधित विद्याशाखेतील विद्यार्थी संख्या वर्ष निहाय | येणारा वार्षिक खर्च रुपये | संबंधित महाविद्यालयास मान्यतेच्या दिनांकापासून विद्यापीठाचे संलग्निकरण आहे किंवा कसे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

उपरोक्त माहिती तात्काळ संचालनालयास सादर करण्यात यावी.

( हरिभाऊ शिंदे )
वरिष्ठ प्रशासन अधिकारी
शिक्षण संचालनालय , उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-०१.